| MHGA070002782021 |
|---|

| | |
|---|---|
| प्राप्त तारीख | ०४.०३.२०२१ |
| नोंदणी तारीख | ०४.०३.२०२१ |
| निकाल तारीख | ०२.०५.२०२६ |
| कालावधी | **०५ वर्षे, ०१ महिने, २८ दिवस** |

**भाग अ***

**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१)]**

| | |
|---|---|
| | **निशाणी – २४** |
| **अहेरी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अहेरी, यांच्या न्यायालयात,<br>पिठासिन अधिकारी : एस.एम.एच.शाहिद,** | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र. ३३/२०२० भामरागड पोलीस ठाणे |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०२.०५.२०२६ |
| प्रकरण क्रमांक | **सं. फौजदारी खटला क्रमांक ५२/२०२१** |
| तक्रारकर्ता / अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन**,<br>मार्फत/पोलीस स्टेशन अधिकारी, भामरागड, |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **सहाय्यक सरकारी अभियोक्ता आर.एस. उंदिरवाडे** |
| आरोपीचे नाव | **राजु पांडू आत्राम,**<br>वय अंदाजे ५५ वर्षे, व्यवसाय शेती,<br>राहणार– भामरागड, ता. भामरागड, जिल्हा– गडचिरोली. |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | आरोपी करीता श्री. गणेश बोगामी<br>(बचाव पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ) |

**भाग ब***

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (२)]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २४.१०.२०२० |
| पहिल्या खबरीची तारीख | २४.१०.२०२० |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | ०४.०३.२०२१ |
| दोषारोपनिश्चितीची तारीख | २१.०६.२०२२ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | ०६.१०.२०२२ |

* दि. १४.०७.२०२२ रोजी प्रकाशित राजपत्र क्र. ०८०१/२०२२ नुसारच्या नमुन्यात.

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | ०२.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०२.०५.२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | – |

**आरोपीबाबत तपशील**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिद्ध की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | राजु पांडू आत्राम | -- | ०४.०३.२०२१ | महाराष्ट्र दारु प्रतिबंध अधिनियम, १९४९ च्या कलम ६५(इ) प्रमाणे दंडनिय | **निर्दोष** | – | – |

| या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ | **फौजदारी संहिता** |
| महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ | **दारुबंदी अधिनियम** |

**भाग क**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३)]**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षीदारांची यादी**

**अ. <u>अभियोग पक्ष</u>:**

| क्रमांक | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र. १ | शोभा लालुजी मडावी (**निशाणी ११ खाली**) | पंच |
| सा.क्र. २ | धिरज विठ्ठल हलामी (**निशाणी १९ खाली**) | फिर्यादी |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने दिलेल्या निशाणीबद्ध दस्तांची यादी**

**अ. <u>अभियोग पक्ष</u>:**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी **पी–१२**/स.सा.क्र.०१ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | निशाणी **पी–१३**/स.सा.क्र.०१ | जप्ती नमुना |
| २. | निशाणी **पी–२०**/स.सा.क्र.०२ | फिर्याद |
| ३. | निशाणी **पी–२१**/स.सा.क्र.०२ | छापिल प्रथम खबर |

**ड. महत्त्वाच्या वस्तु :**

| अ.क्र. | महत्त्वाची वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | २२/२०२०<br>दि.२४.१०.२०२० | रॉयल ब्ल्यु मेल्ट विस्की या विदेशी कंपनीचया १८० एम एल मापपाच्या ०५ निपा |
| २ | २२/२०२०<br>दि.२४.१०.२०२० | गोवा स्पीरीट स्मुथनेस या विदेशी कंपनीच्या १८० एम एल मापाच्या एकूण ०५ निपा |

## न्यायनिर्णय

(दिनांकः ०२ मे, २०२६)

१. अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की, दिनांक २४/१०/२०२० रोजी सायंकाळी अंदाजे ०७.०० ते ०७.३५ वाजताचे दरम्यान मौजा भामरागड येथे आरोपीच्या घरी एका नायलॉन थैलीमध्ये रॉयल ब्ल्यु माल्ट व्हीस्की कंपनीच्या १८० मिली मापाच्या ०५ निपा व गोवा स्पीरीट ऑफ स्मुथनेस कंपनीच्या १८० मिली मापाच्या ०५ निपा दारू बेकायदेशिरपणे विनापरवाना बाळगताना मिळून आले. आरोपीचा गुन्हा सिध्द होण्याकरिता खालील मुद्दे उपस्थित होतात. त्याकरिताचे माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे नमूद केले आहे. आरोपीविरुध्द पुरावा असल्याने तिची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन नि.क्र.२३ खाली मागेच नोंदविण्यात आले. आरोपींचा बचाव पुर्णपणे नकारात्मक आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दिनांक २४/१०/२०२० रोजी सायंकाळी अंदाजे ०७.०० ते ०७.३५ वाजताचे दरम्यान मौजा भामरागड येथे आरोपीच्या घरी एका नायलॉन थैलीमध्ये रॉयल ब्ल्यु माल्ट व्हीस्की कंपनीच्या १८० मिली मापाच्या ०५ निपा व गोवा स्पीरीट ऑफ स्मुथनेस कंपनीच्या १८० मिली मापाच्या ०५ निपा बेकायदेशिरपणे विनापरवाना बाळगताना मिळून आल्याचे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| २ | आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यांत आली. |

## कारणमिमांसा

मुद्दा क्र.१ करिताः

२. आरोपीचा गुन्हा सिध्द करण्याकरिता अभियोगपक्षाने केवळ ०२ साक्षीदार तपासला.

३. सा.क्र.२ **धिरज हलामी** (फिर्यादी) यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, ते आरोपीला ओळखतात. दि.२४.१०.२०२० रोजी ते पोलीस स्टेशन भामरागड येथे कार्यरत होते, त्यादिवशी मुखबीव्दारे खबर मिळाली की, नामे राजु आत्राम हा त्याच्या राहत्या घरी विदेशी दारू बाळगुन विक्री करीत आहे. ही माहिती पोलीस निरीक्षक यांना कळवुन व त्यांच्या आदेशाने ते स्टॉफसह आरोपी राजु आत्राम यांच्या घरासमोर भामरागड येथे गेले. आरोपीला त्याच्या घरा बाहेरून आवाज दिला असता आरोपी घरा बाहेर आला. शेजारचे पंच बोलावुन स्वतःची व पंचांची आरोपीला झडती घेण्यास सांगितली. त्यानंतर ते आरोपीच्या घरात शिरले. आरोपीच्या नायलॉन पिशवीत रॉयल ब्यलयु कंपनीचे १८० मिली मापाच्या ५ निपा, गोवा स्पीरीट कंपनीचे १८० मिली मापाच्या ५ निपा मिळुन आले. त्यापैकी प्रत्येकी एक–एक बॉटल सिए, परक्षिणाकरीता मुकरर केले. त्यानंतर त्यांनी दिसत्या परिस्थिचा पंचनामा नि.क्र.१२ तयार केला. मालमत्ता शोध जप्तीचा नमुना नि.क्र. १३ तयार केला होता, त्यावर त्यांची पंचांची सही असून मजकुर बरोबर आहे. त्यानंतर मुददेमाल व आरोपीसहीत पो. स्टेशन येथे आणला व

आरोपीविरूध्द लेखी फिर्याद नि.क्र.२० व प्रथम छापील खबर नि.क्र.२१ दाखविण्यात आली. पुढील तपास अरूणा हलामी यांनी केला. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी विचारलेल्या सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तर दिले.

४. सा.क्र.१ **शोभा मडावी** (पंच) यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, दि.२४.१०.२०२१ रोजी ते भामरागड पोलीस ठाण्यात कार्यरत होते. त्यांना मुखबीराकडून भामरागड येथे राहते घरी आरोपी दारू विकत असल्याची माहिती मिळाल्याने ते, पोशि.हलामी व पोलीस कर्मचारी व पंच असे तेथे गेले. तेथे त्यांनी त्यांची अंगझउती दिली व शोध घेतला असता आरोपीच्या ताब्यात दोन प्रकारची विदेशी दारू सापडली होती. त्या किती बाटल्या होत्या हे त्यांना माहित नाही. त्यांनी आरोपीला पोलीस ठाण्यात आणले होते. त्यांना घटनास्थळ पंचनामा नि.क्र.१२ व जप्ती नमुना नि.क्र.१३ दिला. आरोपीतर्फे घेण्यात आलेलया उलटतपासात त्यांना घटनास्थळाची तारीख सांगता येत नाही. सद पंचनामा किती वाजता सुरू केला हे सुध्दा सांगता येत नाही. त्याच्या अंगझडतीचा पंचनामा केला नवहता. त्यांनी अमान्य केले की, आरोपीकडे न जाता पोलीस ठाण्यात बसुनच पंचनामा तयार केला.

५. सरकारी अभियोक्ता तसेच आरोपीतर्फे युक्तिवाद ऐकण्यात आला. तसेच दस्तऐवज व पुराव्याचे अवलोकन केले.

६. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर प्रकरणात अभियोग पक्षाने दोन साक्षीदार तपासले. पंच साक्षदार हा फितुर झाले व ईतर साक्षीदार फिर्यादी हे पोलिस साक्षीदार आहे. महत्वाचे म्हणजे तपासी अधिकारी यांची साक्ष नोदंविण्यात आली नाही. जोपर्यंत तपासी अधिकारी व ईतर स्वतंत्र साक्षीदार यांची साक्ष नोंदविली जाणार नाही तोपर्यत आरोपीस दोषी ठरविणे उचित होणार नाही. सदर प्रकरणात जप्त केलेले द्रव्य दारु असल्याबाबतचा दर्शविणारा निर्णायक पुरावा म्हणून रासायनिक पृथःकरण अहवाल अभियोगपक्षाने न्यायालयासमोर सादर केला. परंतु, आरोपीविरुध्द सबळ व सुसंगत पुरावा नसल्यामुळे तसेच अभियोगपक्ष आरोपीविरुध्द सदरचा गुन्हा संशयाचे पलिकडे सिध्द करण्यास असमर्थ ठरला आहे. म्हणुन आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द होवू शकत नाही. सबब, आरोपी हे सदर प्रकरणातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे, या निष्कर्षाप्रत मी येतो. म्हणून मी मुद्दा क्र.१ ला नकारार्थी उत्तर देतो.

**मुद्दा क्र. २ करिताः**

७. वर चर्चा केल्याप्रमाणे आणि अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द न केल्याने सदर गुन्हयातून त्यांना निर्दोष मुक्त करणे मला न्यायोचित वाटते. सबब, त्याबाबतचे आदेश पारित करणे योग्य होईल. म्हणून, मुद्दा क्र.२ चे उत्तरार्थ खालील आदेश पारित करतो.

**आदेश**

१. आरोपी **राजु पांडू आत्राम** फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये मुंबई दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) नुसार दंडनिय अपराधातून निर्दोष ठरवून मुक्त करण्यांत येते.

२. आरोपीचे जामीनपत्र रद्द करुन जामीनदाराला मुक्त करण्यांत येते.

३. आरोपीने फौ.प्र.सं. कलम ४३७–अ अंतर्गत वरिष्ठ न्यायालयात अपिल करिता हजर राहण्याकामी रूपये ५०,०००/– प्रत्येकीचा जामीन दाखल करावा.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४५२ नुसार असे आदेशित करण्यात येते की, मुददेमाल अपिल कालावधीनंतर यातील जप्त असलेल्या मुद्देमालाची विल्हेवाट राज्य उत्पादन शुल्क विभाग गडचिरोली यांनी लावावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID
Date: 2026.05.02 15:45:49 +0530

**(एस.एम.एच.शाहिद)**

दि.०२.०५.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहेरी